दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र |गुरुवार, 12 फेब्रुवारी 2026 | |अंक क्र. 265 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com

"आपल्या माणसांसाठी आपल्या चवीचं हॉटेल"
हॉटेल बालाजी
ब्रम्हवाडी फाटा, बीड रोड, परळी वै.




## महाशिवरात्र उत्सव

देशभरातील बारा ज्योतिर्लिंगांपैकी पाचवे ज्योतिर्लिंग म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वैद्यनाथाच्या नगरीत महाशिवरात्रीच्या पार्श्वभूमीवर दरवर्षी देशभरासह परदेशातूनही भाविक दाखल होत असतात. या पार्श्वभूमीवर भाविकांना सुरळीत व सुरक्षित दर्शन व्यवस्था उपलब्ध व्हावी, तसेच कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी आज प्रशासनाच्या वतीने महत्त्वपूर्ण बाबींचा आढावा बैठकीत घेण्यात आला.

परळीत देशपातळीवरील 'महापशुधन एक्स्पो 2026'; पशुपालकांसाठी सुवर्णसंधी ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकारातून 32 एकरात भव्य पशुपक्षी प्रदर्शन

महाशिवरात्रीच्या भक्ती भावाच्या उत्सवामध्ये कुठलीच कमतरता भासणार नाही याची दक्षता सर्व विभागाने घ्यावी अशा प्रकारच्या सूचना यावेळी संबंधित विभागांना देण्यात आल्या.

पशुपालन विषयक प्रात्यक्षिके आदींसह सुमारे विविध विषयांवरील 300 स्टॉल उभारण्यात येणार आहेत. याशिवाय विविध प्रकारचे 45 हून अधिक स्पर्धा घेण्यात येणार आहेत

देशभरातील 1300 हून अधिक उच्च दर्जाच्या पशुधन व विविध पक्षीप्रजाती या प्रदर्शनात सहभागी होणार आहेत. गायी, म्हशी, शेळ्या-मेंढ्या, घोडे, कुक्कुट तसेच दुर्मिळ पक्ष्यांच्या जाती पाहण्याची संधी या निमित्ताने उपलब्ध होणार आहे

# अप्पर जिल्हाधिकारी श्रीमती अश्विनी सोनावणे- जिरंगे मॅडम यांनी घेतलेल्या- महाशिवरात्र आणि पशुधन महा- एक्सपोच्या पार्श्वभूमीवर बैठकीत विविध विभागांच्या तयारीचा घेतला आढावा

### विविध विभागातील तयारी संदर्भात केल्या आवश्यकता सूचना ; कुठल्याच प्रकारचा हलगर्जीपणा नको !





विशेषबातमीपत्र | नितीन ढाकणे

आगामी महाशिवरात्र महोत्सव आणि देशपातळीवरील राष्ट्रीय पशुधन महा-एक्स्पो या दुहेरी गर्दीच्या पार्श्वभूमीवर परळी शहरात प्रशासन सतर्क झाले असून विविध विभागांची समन्वय बैठक पार पडली. अप्पर जिल्हाधिकारी आंबेजोगाई श्रीमती अश्विनी सोनवणे-जिरंगे यांच्या प्रमुख उपस्थितीत वैद्यनाथ देवस्थान समिती व संबंधित प्रशासकीय विभागांचा महत्त्वपूर्ण आढावा घेण्यात आला.

बैठकीत भाविक आणि नागरिकांच्या सुरक्षिततेसह सुविधा व्यवस्थेवर सखोल चर्चा करण्यात आली.

### खालील मुद्द्यांवर सविस्तर आढावा-

- मंदिर व शहर परिसरातील स्वच्छता व्यवस्था
- भाविकांना दिल्या जाणाऱ्या अन्नपदार्थांची अन्न सुरक्षा तपासणी
- पालखी मार्ग व सोमेश्वर पालखी मार्गाचे व्यवस्थापन
- आपत्कालीन परिस्थितीसाठी आरोग्य यंत्रणेची सज्जता
- वाढत्या गर्दीचा विचार करून वाहतूक नियोजन
- अखंडित वीज पुरवठा
- पाणीपुरवठा व्यवस्थेची तयारी

अप्पर जिल्हाधिकारी सोनवणे-जिरंगे यांनी सर्व विभागांना स्पष्ट सूचना देत तातडीच्या बाबींवर विशेष लक्ष केंद्रित करण्याचे निर्देश दिले.

बैठकीनंतर उपस्थित पत्रकारांनी मांडलेल्या स्थानिक अडचणी व सूचनांचीही दखल घेण्यात आली. त्यावर प्रशासनाकडून सकारात्मक भूमिका घेत योग्य त्या उपाययोजना करण्याचे आश्वासन देण्यात आले.

### मंदिर परिसराची प्रत्यक्ष पाहणी

बैठकीनंतर अप्पर जिल्हाधिकारी यांनी वैद्यनाथ मंदिर परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली. भाविकांसाठी उपलब्ध सुविधा, गर्दी नियोजन, स्वच्छता व सुरक्षेची स्थिती यांचा आढावा घेऊन आवश्यक त्या ठिकाणी तात्काळ सुधारणा करण्याच्या सूचना देण्यात आल्या.

### दुहेरी गर्दीमुळे प्रशासनाची विशेष तयारी-

महाशिवरात्र महोत्सव आणि महापशुधन एक्स्पो या दोन्ही मोठ्या कार्यक्रमांमुळे परळीत मोठ्या प्रमाणावर भाविक व नागरिकांची उपस्थिती अपेक्षित आहे. या पार्श्वभूमीवर झालेली ही बैठक प्रशासनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वपूर्ण ठरली असून सुरक्षित, स्वच्छ आणि सुकर व्यवस्थापन करण्यासाठी ठोस उपाययोजना आखण्यात आल्या.

बैठकीस परळीचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, परळी शहर व ग्रामीणचे पोलीस निरीक्षक, परळीच्या नगराध्यक्षा, नगरपालिकेचे मुख्याधिकारी, गटविकास अधिकारी, विविध विभागांचे अधिकारी-कर्मचारी व पत्रकार बांधव उपस्थित होते.

## परळीतील ऐतिहासिक महापशूधन एक्स्पोचे शुक्रवारी ना. पंकजाताई मुंडेंच्या हस्ते उद्घाटन ; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस 15 ऐवजी 14 तारखेला येणार

परळी | वैजनाथ

प्रभू वैद्यनाथाच्या नगरीत राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या पुढाकाराने ऐतिहासिक व भव्य असे राष्ट्रीय स्तरावरील महापशुधन एक्स्पो पहिल्यांदाच भरत आहे. या पशू प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवारी ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते होत आहे. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे शनिवार १४ तारखेला परळीत येणार आहेत.

शहरातील वैद्यनाथ महाविद्यालयाच्या समोरील ओपळे मैदानात पशुसंवर्धन विभागाच्या वतीने १३ ते १५ फेब्रुवारी दरम्यान `अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे` भव्य आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये देशभरातील विविध प्रजातींचे एक हजाराहून अधिक पशू सहभागी होणार असून प्रदर्शनाच्या जय्यत तयारीला सध्या वेग आला आहे. शुक्रवारी १३ तारखेला सकाळी ११ वा. प्रदर्शनाचे उद्घाटन ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते व मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

### मुख्यमंत्री १५ ऐवजी १४ तारखेला परळीत येणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे निमंत्रण पत्रिकेनुसार प्रदर्शनाच्या समारोपाला म्हणजे रविवारी १५ तारखेला



येणार होते परंतु ते आता शनिवार १४ फेब्रुवारी रोजी सकाळी ११ वा. शहरात येणार आहेत. मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

### पशुप्रदर्शन ऐतिहासिक

या प्रदर्शनात पशुपालकांना गायी, म्हशी, घोडे, शेळ्या-मेंढ्या आणि विविध पक्ष्यांच्या दर्जेदार प्रजाती पाहायला मिळणार आहेत. केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशातील प्रगतशील पशुपालक व शेतकरी या ठिकाणी हजेरी लावणार आहेत. पशुपालकांना आधुनिक पशुपालन, आहार व्यवस्थापन आणि आरोग्याविषयी सविस्तर माहिती या माध्यमातून मिळणार आहे. राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने ना.पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली या

पशुसंवर्धन विभाग, महाराष्ट्र शासन आयोजित
१३ - १५ फेब्रुवारी, २०२६
महा पशुधन एक्स्पो
परळी वैजनाथ

प्रदर्शनाचे नियोजन अत्यंत प्रभावीपणे करण्यात येत आहे. परळी वैजनाथ येथे प्रदर्शनासाठी भव्य मैदान व पशुधनासाठी आवश्यक सुविधा उभारण्याचे काम सध्या अंतिम टप्प्यात आले आहे.

### हा अत्यंत सुंदर योगायोग

महाशिवरात्र आणि महा पशुधन एक्सपो हा अत्यंत सुंदर योगायोग आहे. या खात्याची मंत्री म्हणून परळीत असे प्रदर्शन व्हावे अशी माझी इच्छा होती.

नवीन तंत्रज्ञान व दर्जेदार पशुधनाची माहिती घेण्यासाठी हे प्रदर्शन एक महत्त्वपूर्ण व्यासपीठ ठरणार आहे. बीड जिल्ह्यासह राज्यातील जास्तीत जास्त पशुपालकांनी या तीन दिवसीय प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन ना. पंकजाताई यांनी केले आहे.

## आष्टीच्या प्रथम घोडकेची 24 व्या वर्षी कृषी उपसंचालक पदी निवड

### MPSC परीक्षेत घवघवीत यश; घोडके कुटुंबावर अभिनंदनाचा वर्षाव

आष्टी |प्रतिनिधी

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (MPSC) घेण्यात आलेल्या परीक्षेत नगरसेवक बाळासाहेब घोडके यांचे चिरंजीव प्रथम रूपाली सुधिर घोडके यांनी दैदीप्यमान यश संपादन केले आहे. प्रथम यांची कृषी उपसंचालक (वर्ग-१) पदी निवड झाली असून, त्यांच्या या यशामुळे आष्टी तालुक्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे . आष्टी तालुक्यातील मान्यवरांकडून शुभेच्छा देऊन अभिनंदन केले जात आहे.

प्रथम घोडके यांनी आष्टी येथील पंडित नेहरू विद्यालयातून प्राथमिक व माध्यमिक शिक्षण पूर्ण करून कोल्हापूर येथे राजश्री शाहू कृषी महाविद्यालयातून पदवी प्राप्त करून राहुरी येथे एमएससी शिक्षण चालू असताना वयाच्या 23 व्या वर्षी कृषी क्षेत्रामध्ये वर्ग एक साठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केले असून प्रथम रूपाली बाळासाहेब घोडके याची कृषी उपसंचालक वर्ग एक पदासाठी



निवड झाली आहे. ग्रामीण भागातील प्रथम याने अवघ्या वयाच्या 24 व्या वर्षी हे यश संपादन केल्यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी एक आदर्श बनला आहे . प्राथमिक आणि उच्च शिक्षण पूर्ण केल्यानंतर स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून प्रशासकीय सेवेत जाण्याचे स्वप्न उराशी बाळगले होते. शेती आणि शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी प्रथम याने कृषी क्षेत्राची निवड केली. प्रथम याने पहिल्याच प्रयत्नात यश मिळवून आपल्या कौशल्याची चुणूक दाखवून दिली आहे.

नगरसेवक बाळासाहेब घोडके यांनी आपल्या मुलाच्या या यशाबद्दल आनंद व्यक्त करताना सांगितले की, "प्रथमेशने सातत्य आणि मेहनतीच्या जोरावर हे यश मिळवले आहे. समाजसेवेचा जो वारसा आम्ही जपला आहे, तोच वारसा तो आता प्रशासकीय अधिकारी म्हणून पुढे नेईल, याचा आम्हाला अभिमान आहे.

प्रथमेश यांच्या निवडीचे वृत्त समजताच राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी घोडके यांचे अभिनंदन केले. ग्रामीण भागातील तरुणांपुढे प्रथमेश यांनी एक नवा आदर्श उभा केला असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. प्रथम घोडके यांनी मिळवलेल्या यशाबद्दल मराठवाडा भूषण आमदार सुरेश धस माजी आमदार भीमराव धोंडे माजी आमदार साहेबराव दरेकर माजी आमदार बाळासाहेब आजबे सरपंच परिषदेचे प्रदेशाध्यक्ष दत्ताभाऊ काकडे शाहू महाराज शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सुखदेव पोकळे नगराध्यक्ष जिया बेग,सभापती बद्रीनाथ जगताप, उपनगराध्यक्ष शैलेश सहस्त्रबुद्धे माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

# ४ थी आंतरराष्ट्रीय (RFCCN) रिजनल फेडरेशन ऑफ क्रिटिकल केअर नर्सिंग – सार्क परिषद व ८ वी राष्ट्रीय क्रिटिकल केअर नर्सिंग परिषद यशस्वी : जिजो थॉमस

**(प्रतिनिधी : पुणे)**

सिम्बायोसिस आंतरराष्ट्रीय विद्यापीठाच्या कॅम्पसमधील हॉटेल संदीपानी येथे जगभरातील नर्सिंग अभ्यासक, प्राध्यापक आणि नर्सिंग ऑफिसर्स यांच्या उपस्थितीत ४ थी आंतरराष्ट्रीय (RFCCN) रिजनल फेडरेशन ऑफ क्रिटिकल केअर नर्सिंग – सार्क परिषद व ८ वी राष्ट्रीय क्रिटिकल केअर नर्सिंग परिषद यशस्वीपणे पार पडली.

ही परिषद ६ फेब्रुवारी २०२६ रोजी सुरू झाली. परिषदेत भारत तसेच सार्क देशांतील विविध रुग्णालये व शैक्षणिक संस्थांमधील १४९ हून अधिक प्रतिनिधी सहभागी झाले होते. याशिवाय ऑस्ट्रेलिया, लायबेरिया आदी देशांतील आंतरराष्ट्रीय प्रतिनिधींचीही उपस्थिती होती.

या परिषदेत भारत व परदेशातील क्रिटिकल केअर परिचारिका, शिक्षक आणि नर्सिंग नेते एकत्र आले होते. क्रिटिकल केअर नर्सिंगमधील प्रगत पद्धती, सुधारणा आणि भविष्यातील दिशा यावर सखोल चर्चा करण्यात आली.

दोन दिवसीय परिषद "जोखीम, सज्जता आणि लवचिकता – क्रिटिकल केअरमधील उत्कृष्टतेचे प्रवेशद्वार" या संकल्पनेवर आधारित होती. क्रिटिकल केअर नर्सिंगच्या सरावामध्ये सज्जता, व्यावसायिक क्षमता आणि लवचिकता बळकट करणे हा परिषदेचा मुख्य उद्देश होता.

परिषदेच्या पहिल्या दिवसाची सुरुवात महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ (MUHS) नर्सिंग विभागाच्या अधिष्ठाता डॉ. श्रीलेखा राजेश यांच्या स्वागतपर भाषणाने झाली.

सीसीएनएस इंडियाच्या संस्थापक व माजी अध्यक्षा प्रा. डॉ. जया कुरुविला यांनी मुख्य भाषणात क्रिटिकल केअरमधील नेतृत्व व नैतिक निर्णयक्षमतेवर सखोल प्रकाश टाकला.

या कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ. सुभाष आचार्य, कार्यकारी संचालक, त्रिभुवन युनिव्हर्सिटी टीचिंग हॉस्पिटल, नेपाळ यांच्या हस्ते झाले. त्यांनी क्रिटिकल केअर प्रणालींबाबत जागतिक दृष्टिकोन मांडला.

परिषदेत दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, नेपाळ आणि भारत येथील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय वक्त्यांचा प्रतिष्ठित पॅनेल सहभागी झाला होता. त्यांनी समकालीन क्रिटिकल केअर पद्धतींबाबत विविध अंगांनी मार्गदर्शन केले.

वैज्ञानिक कार्यक्रमांतर्गत पॅनेल चर्चा, संवेदीकरण सत्रे, डिलेमा कॅफे, व्हॉइस-आऊट सत्रे तसेच CCNS Mastermind यांचा समावेश होता. एआय-आधारित तंत्रज्ञानाच्या माध्यमातून परिचारिकांसाठी आभासी प्रशिक्षण, तसेच "एआयच्या युगातील नर्सिंग" या विषयावर पॅनेल चर्चा व रोचक वादविवाद हे परिषदेचे प्रमुख आकर्षण ठरले. प्रतिनिधींमध्ये उत्स्फूर्त सहभाग व चिकित्सक विचारांची देवाणघेवाण दिसून आली.



परिषद दुसऱ्या दिवशी, म्हणजेच ७ फेब्रुवारी २०२६ रोजी, क्रिटिकल केअर नर्सिंगमधील उत्कृष्टतेला चालना देणाऱ्या शैक्षणिक चर्चा व संवादात्मक शिक्षण सत्रांसह पुढे सुरू राहिली.

एकूणच या दोन दिवसीय परिषदेत नर्सिंग कौशल्ये बळकट करणे, क्लिनिकल सज्जता वाढवणे तसेच उच्च-तीव्रतेच्या वातावरणात कार्यरत परिचारिकांमध्ये पुरावा-आधारित सराव, व्यावसायिक विकास आणि लवचिकता वाढवण्यावर भर देण्यात आला.

परिषदेचा समारोप सकारात्मक वातावरणात पार पडला. गंभीर काळजी नर्सिंगमध्ये सातत्यपूर्ण शिक्षण व उत्कृष्टतेचे महत्त्व या परिषदेमुळे अधोरेखित झाले, अशी माहिती जिजो थॉमस यांनी दिली.

# शेत जमिनींच्या NA परवानगीसाठी आता जिल्हाधिकाऱ्यांकडे जाण्याची गरज नाही : राज्य सरकारचा मोठा निर्णय

**मुंबईः वृत्तसंस्था**

शेत जमिनींचे निवासी, व्यावसायिक किंवा औद्योगिक वापरासाठी बिनशेती (अकृषिक) NA परवानगीची अट आता कायमची रद्द करण्यात आली आहे. राज्य सरकारच्या निर्णयानुसार, हे अधिकार आता थेट स्थानिक स्वराज्य संस्थांना (नियोजन प्राधिकरणांना) दिले आहेत. त्यामुळे नागरिकांना जिल्हाधिकाऱ्यांकडे स्वतंत्र परवानगी घेण्यासाठी वेळ घालवण्याची गरज संपली आहे.

जमिनीच्या NA (Non-Agricultural) परवानग्याबाबतचा हा ऐतिहासिक निर्णय नागरिकांना मोठा दिलासा देणारा ठरला आहे, तसेच प्रशासकीय प्रक्रिया सुलभ होणार आहे.



■ **नवीन नियम काय बदलतो?**

आता शेत जमीन बिनशेतीसाठी वापरण्याची परवानगी नगर रचना विभाग आणि स्थानिक नियोजन प्राधिकरणाने दिलेली बांधकाम परवानगीच

■ **NA परवानगी मानली जाईल.**

यामुळे जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वतंत्र NA सनद घेण्याची आवश्यकता संपली.

बांधकाम परवानगी मिळताच ती महसूल विभागाच्या संगणकीय प्रणालीत नोंदवून 7/12 उताऱ्यात आपोआप फेरफार केली जाईल.

बांधकाम परवानगीसाठी आता BPMs/ ऑटो DCR प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज करता येईल, त्यामुळे नागरिकांना विनाकिरकोळ प्रक्रिया सुलभ आणि पारदर्शक होईल.

■ **बँकांबाबत महत्त्वाचे निर्देश-**

अनेक बँका NA सनदेची मागणी कर्ज प्रक्रियेत करतात. मात्र महसूल विभागाने निर्देश दिले आहेत की: नियोजन प्राधिकरणाची बांधकाम परवानगी मिळाल्यास बँकांनी NA सनदेची मागणी करू नये.

याबाबतचे आदेश सर्व संबंधित बँकांना जिल्हाधिकारी कार्यालयांमार्फत कळवले जाणार आहेत.

■ **दुहेरी प्रक्रियेतुन सुटका-**

याआधी शेतजमीन मालकांना प्रथम स्थानिक प्राधिकरणाकडून बांधकाम परवानगी घ्यावी लागे, आणि नंतर ती जिल्हाधिकाऱ्यांकडे पाठवावी लागे. या दुहेरी प्रक्रियेमुळे नागरिकांचा वेळ वाया जात होता व अनेक अर्ज लवकर निष्पन्न होत नव्हते. आता हा त्रास दूर झाला आहे.

या निर्णयामुळे नागरिकांना वेळेची बचत, प्रशासकीय प्रक्रिया सुलभता आणि व्यावसायिक वाढीस चालना मिळण्यास मदत होणार आहे.



■ आष्टी तालुका पत्रकार संघाचे जेष्ठ मार्गदर्शक आणि भिष्मपिता असलेले प्रफुल्ल सहस्त्रबुध्दे यांची आष्टी ग्रामीण रुग्णालय अशासकीय समितीच्या सदस्यपदी निवड झाल्याबद्दल व पत्रकार शरद रेडेकर यांनी स्टारहेल्थ ची परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल पत्रकार संघाच्यावतीने सत्कार करतांना संघाचे अध्यक्ष संतोष सानप, दत्ताभाऊ काकडे,भीमराव गुरव,प्रविण पोकळे,शरद तळेकर,मनोज पोकळे,सचिन रानडे,गणेश दळवी दिसत आहेत.

# खरडगाव न्यू इंग्लिश स्कूलच्या शिक्षकांनी विद्यार्थ्यांना संस्कार दिले– प्राचार्य डॉ .भागवत बारस्कर

**आष्टी (प्रतिनिधी)**

"विद्यालय हे संस्काराचे केंद्र असते; किंबहुना अत्यंत तळमळीतून परिश्रमपूर्वक अध्यापन कर्तव्य बजावत विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाच्या गोडी बरोबरच सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण करण्यात खरडगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलच्या शिक्षक बांधवांचे परिश्रम यशस्वी झाले आहेत, त्याचा अभिमान वाटतो!" असे प्रतिपादन आबासाहेब काकडे अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भागवत बारस्कर यांनी आज केले.

समता जोगेश्वरी शिक्षण मंडळाच्या खरडगाव येथील न्यू इंग्लिश स्कूल मधील इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना आज बुधवारी समारंभपूर्वक निरोप देण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून श्रीयुत बारस्कर बोलत होते. अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक अरविंद देशमुख होते. यावेळी मंचावर ज्येष्ठ अध्यापक राजेंद्र शिंपी, गजानन मस्के, रेखा हरदास, कल्याण जगताप, किशोर पवार, डॉ.आशा फड, मोनाली कर्डक, गणेश बाबर, अनिल पवार, मयूर साळवे आदी सह मान्यवरांची उपस्थिती होती.

प्रारंभी पाहुण्यांच्या हस्ते सरस्वतीचे पूजन करून दीपप्रज्वलन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजनही करण्यात आले.

प्राचार्य डॉ. भागवत बारस्कर पुढे म्हणाले, "खरडगाव येथील न्यू इंग्लिश स्कूलची इमारत, परिसर, अभ्यास खोल्या आणि एकूण प्रसन्न वातावरण यातून विद्यार्थ्यांना अध्ययन करणे सुलभ जाते. शिक्षक बांधवांनी अध्यापन कार्यातून स्वावलंबी सकारात्मक दृष्टिकोन आदी सह मूल्य बिंबवले. यातून भविष्यातील विद्यार्थी यशस्वी होतील.. असा विश्वासही त्यांनी अनेक उदाहरणे देत व्यक्त केला. दहावीतील विद्यार्थ्यांना त्यांनी परिक्षेसाठी शुभेच्छाही दिल्या. अध्यक्षस्थानावरील भाषणातून मुख्याध्यापक अरविंद देशमुख यांनी शाळेचा निकाल १००% लागावा यासाठी विद्यार्थ्यांना मौलिक मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या.

यावेळी कल्याण जगताप, गजानन मस्के, रेखा हरदास, डॉ. आशा फड यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत शुभेच्छा दिल्या. दयानंद गजभिव, शिवाजी देशमुख यांनी परिश्रम घेतले.

निरोप समारंभाचे प्रस्ताविक विद्यार्थिनी दिपाली कुसारे हिने केले. सूत्रसंचालन अमृता बोडखे हिने; तर सर्वांचे आभार कु. ज्ञानेश्वरी बोडखे यांनी मानले.

इयत्ता दहावीतील विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षक बांधवांचे स्वागत प्रसंगी गुलाब पुष्प देऊन मनःपूर्वक ऋण व्यक्त करून आशीर्वाद घेतले. यावेळी अध्यापकांनी सर्व विद्यार्थ्यांना नववीच्या विद्यार्थ्यांच्या वतीने शैक्षणिक साहित्य देऊन भविष्या तील यशासाठी सदिच्छा व्यक्त केल्या. यावेळी वातावरण अत्यंत भावूक झाले होते.



# नवनिर्वाचित जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्यांचा भजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सत्कार




**लातूर | प्रतिनिधी**

लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील भारतीय जनता पार्टीच्या नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांचा भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघात भातांगळी जिल्हा परिषद गटातून महादेव साळुंके, खरोळा गटातून सौ. शिवकन्या महेंद्र गोडभरले, भादा गटातून सौ. छायाबाई पद्माकर चिंचोलकर तसेच भातांगळी पंस गणातील पांडुरंग बालवाड, कामखेडा गणातील शरद दरेकर, शिवली गणातील सौ. प्रणिता राजकिरण साठे आणि बोरी गणातील सौ. सिंधुताई खुरदळे यांनी विजय मिळविला.

भाजपा लातूर मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या सत्कार समारंभात भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते भाजपाचे नवनिर्वाचित जिल्हा परिषद आणि पंचायत समिती सदस्यांचा यथोचित सत्कार करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा देण्यात अल्या. प्रारंभी भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांचा मंडल अध्यक्ष प्रताप पाटील आणि सुरज शिंदे यांनी सत्कार केला.

याप्रसंगी भातांगळी जिप गटातील महादेव साळुंके, खरोळा जिप गटातील महेंद्र गोडभरले, भादा जिप गटातील पद्माकर चिंचोलकर आणि भातागळी पंस गणातील पांडुरंग बालवाड, कामखेडा गणातील शरद दरेकर, शिवली गणातील सौ. प्रणिता यांच्या वतीने राजकारण साठे यांनी तर बोरी गणातील सौ. सिंधुताई खुरदळे यांच्या वतीने बंधू हनुमंत गव्हाणे यांनी सत्कार स्वीकारला.

याप्रसंगी भाजपाचे साहेबराव मुळे, वसंत करमुडे, लक्ष्मण यादव, किरण मुंडे, ॲड. सतीश बिराजदार, सोमनाथ पावले, गोविंद मुंडे, ओम चव्हाण, बालाजी गवळी, सुभाष राठोड, महादेव मुळे, रमेश पाटील, श्रीराम साळुंके यांच्यासह अनेकजण होते.

दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# फ्रान्सकडून 114 राफेल खरेदीचा प्रस्ताव; मॅक्रॉन यांच्या भारतभेटीत करारावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता



**नवी दिल्ली | वृत्तसंस्था**

आगामी 18 ते 20 फेब्रुवारी दरम्यान भारतात होणाऱ्या AI समिट साठी फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्रॉन भारत दौऱ्यावर येण्याची शक्यता असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्याआधीच संरक्षण मंत्रालयात एक अतिमहत्त्वाचा प्रस्ताव चर्चा व मंजुरीच्या टप्प्यात आहे — भारताने फ्रान्सकडून 114 नवीन राफेल फाइटर जेट्सची खरेदी करण्याबाबत देणगी देणारा प्रस्ताव.

### ■ डीएसी बैठकेत प्रस्तावाची शक्य मंजुरी

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्या अध्यक्षतेखालील रक्षा अधिग्रहण परिषद् (DAC) फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यात बैठक घेऊन राफेल जेट्सच्या खरेदीसाठी "Acceptance of Necessity (AoN)" मंजुरी देण्याचा प्रस्ताव समोर आला आहे.

हा प्रस्ताव ₹.25 लाख कोटींहून अधिक खर्चाचे असल्याचे अंदाज व्यक्त केला जात आहे आणि त्यावर निर्णय मॅक्रॉन यांच्या भेटीपूर्वी मिळण्याची शक्यता आहे.

### ■ खरेदी व उत्पादनाची रूपरेषा

या प्रस्तावानुसार 114 राफेल विमानांची खरेदी करण्यात येणार आहे, ज्याचा उद्देश भारतीय हवाई दलाची लढाऊ क्षमता मजबूत करणे हा आहे.

अपेक्षित योजनेंतर्गत, 18 विमान फ्रान्समधून "fly-away condition" मध्ये प्राप्त होतील आणि उर्वरित 96 विमान भारतात निर्मितीच्या भागीदारीने तयार होतील — यामुळे Make in India आणि संरक्षणातील स्थानिक उत्पादनक्षमता वाढू शकते.

प्रस्तावित विमाने 88 सिंगल-सीटर व 26 ट्विन-सीटर स्वरूपात असतील आणि विमाने तसेच त्यांचे देखभाल व उत्पादन क्षेत्रात भारतीय उद्योगसुद्धा सहभागी होतील.

या करारात भारताने maximise local-content करण्यासाठी चर्चा सुरु केली असून सुमारे 80% विमान भारतात बनवण्याचे उद्दिष्ट आहे.

### ■ भारतीय वायुसेना क्षमता व आवश्यकता

सध्या भारतीय हवाई दल जवळपास 30 स्क्वॉड्रन ऑपरेट करत आहे, ज्याची मंजूर क्षमता 42 स्क्वॉड्रनपेक्षा कमी आहे. या प्रस्तावित खरेदीमुळे हवाई दलाची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढण्याची अपेक्षा आहे.

नवीन राफेल विमाने भारताच्या सामरिक आवश्यकतांना तोंड देण्यास सक्षमता वाढवतील तसेच पाकिस्तान, चीन व इतर आव्हानांशी सामना करण्यासाठी युद्ध क्षमताही सुदृढ करतील — विश्लेषकांचा असा दृष्टिकोन आहे.


### ■ भारत-फ्रान्स धोरणात्मक भागीदारीला बळ

फ्रान्सच्या राष्ट्राध्यक्षांच्या भेटीत हा प्रस्ताव अंतिम स्वरूपात आधीच आज्ञाकारी होण्याची शक्यता असण्याचे संकेत द्वीट केले जात आहेत, ज्यामुळे भारत-फ्रान्स संरक्षण सहकार्य अधिक प्रभावी स्वरूपात पुढे जाऊ शकते.

या करारामुळे रणनीतिक भागीदारी, तांत्रिक सहयोग, असम्र क्षमतांचे विस्तारीकरण आणि दोन्ही देशांमधील विश्वास वाढण्याची शक्यता आहे.

भारत फ्रान्सकडून 114 राफेल विमाने खरेदी करण्याच्या अत्यंत महत्त्वाच्या प्रस्तावाच्या टप्प्यावर आहे, आणि हा प्रस्ताव मॅक्रॉन यांच्या भारत दौऱ्याच्या पार्श्वभूमीवर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. ही खरेदी भारतीय वायुसेनेची क्षमता मोठ्या प्रमाणात वाढविणारी, 'मेक इन इंडिया' धोरणाला पंख देणारी आणि भारत-फ्रान्स संरक्षण संबंध अधिक दृढ करणारी पायरी ठरू शकते

# एपस्टाईन फाइल्सने जागतिक राजकारणात मोठी खळबळ




कुख्यात गुन्हेगार जेफ्री एपस्टाईनशी संबंधित दस्तऐवज (Epstein Files) अमेरिकेच्या न्याय विभागाने प्रकाशित केल्या असून त्यांचा प्रभाव आतापर्यंतच्या खोल आणि व्यापक आहे. या फाइल्समधील खुलाश्यांमुळे राजकारण, सामाजिक प्रतिष्ठा आणि प्रशासकीय विश्वास यांना जबरदस्त धक्का बसला आहे आणि अनेक उच्च-स्तरीय राजकीय आणि शासकीय नेत्यांचे पदांवरून हटणे, चौकश्या व राजीनाम्यांची लाट सुरू झाली आहे.

### ■ ब्रिटनमध्ये राजकारणात घोंघळ

ब्रिटनमध्ये एपस्टाईन फाइल्सच्या प्रकाशनानंतर लेबर पार्टीशी संबंधित वरिष्ठ नेत्यांवर आरोप व दबाव वाढला आहे.

काही वरिष्ठांनी आणि प्रमुख सहयोगींनी पद सोडण्याचे निर्णय घेतले आहेत.

यामुळे पंतप्रधान केइर स्टार्मर आणि त्यांच्या प्रशासनाला दबावाचा सामना करावा लागत आहे, आणि राजकीय चर्चेत पारदर्शकता व जवाबदारी यावर प्रश्न उभे राहिले आहेत.

### ■ फ्रान्समध्ये उच्चस्तरीय राजीनामा

फ्रान्समधील प्रतिष्ठित राजकारणी जॅक लँग यांनी हे अरब वर्ल्ड इन्स्टिट्यूट चे अध्यक्षपद सोडले आहे, ज्यावर वित्तीय चौकशी आणि आरोप सुरु आहेत.

त्यांच्या फाइल्समध्ये नाव अनेक वेळा दिसल्याने आणि संदिग्ध आर्थिक व्यवहारांच्या दाव्यांमुळे, त्यांनी स्वतःचा राजीनामा देण्याचा निर्णय घेतला.

### ■ नॉर्वेमध्ये चौकशी आणि राजीनामे

नॉर्वेची राजनयिक मोना जूल यांनी राजदूतपदावरून राजीनामा दिला आहे, कारण फाइल्समधील त्यांच्या आणि एपस्टाईनच्या संपर्काबद्दल गंभीर शंका उपस्थित झाली आहे.

आता नॉर्वेच्या आर्थिक गुन्हे तपास यंत्रणा (Oekokrim) या प्रकरणाची चौकशी करत आहे आणि आणखी वरिष्ठ राजकीय व्यक्तींचाही समावेश होऊ शकतो.

### ■ अमेरिकेतील परिणाम आणि दबाव

अमेरिकेतही एपस्टाईनशी संबंधित उच्च पदस्थ प्रशासन सदस्यांवर राजीनाम्यांचा दबाव किंवा राजकीय मागण्या वाढल्या आहेत.

कांग्रेसमध्ये काही सदस्यांनी आणि राजकीय नेत्यांनी संबंधित व्यक्तींना पद सोडण्याची मागणी केली आहे, त्यामुळे मामला अजूनही चर्चेचा विषय आहे.

### ■ जागतिक परिणाम — राजीनाम्यांची लाट आणि चौकशीचा विस्तार

Epstein Files च्या प्रकाशनानंतर अमेरिका, युरोप (ब्रिटन, फ्रान्स, नॉर्वे) आणि इतर अनेक देशांमध्ये अधिकारी, राजकारणी, उद्योगपती आणि सामाजिक प्रतिष्ठित व्यक्तींवर जवाबदेही, चौकशी आणि राजीनामा या घडामोडीचे परिणाम दिसत आहेत.

या प्रकरणामुळे राजकीय नैतिकता, सार्वजनिक विश्वास आणि नेतृत्वाचे रूप यावर चर्चा वाढली आहे आणि जगभरातील राजकारणात दीर्घकालीन प्रभाव पडण्याची शक्यता आहे.

"Epstein Files" प्रकरणातील खुलासे फक्त गुन्हेगारी इतिहासापुरते मर्यादित न राहता जागतिक राजकारणातील उच्च-अस्थीतांवर, दीर्घकालीन नैतिक प्रश्न आणि नेतृत्वावर गंभीर परिणाम करत आहेत. राजकीय नेतृत्वाची पारदर्शकता, उच्चाधिकारींची जवाबदारी आणि सार्वजनिक विश्वास याबद्दल नवीन चर्चा पुन्हा एकदा जागृत झाल्या आहेत.

# शून्य गुंतवणुकीच्या आधुनिक शेतीतून शाश्वत उत्पन्नाची सुवर्णसंधी!

**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**



पारंपरिक शेतीतून मिळणारे अत्यल्प उत्पन्न, वाढते उत्पादनखर्च आणि अनिश्चित बाजारभाव या तिहेरी संकटात शेतकरी सापडलेला आहे. मेहनत प्रचंड, परंतु उत्पन्न मात्र मर्यादित... या वास्तवामुळे ग्रामीण अर्थचक्राला खीळ बसत आहे. अशा परिस्थितीत आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत शाश्वत शेतीकडे वाटचाल करणे ही काळाची गरज ठरत आहे. मात्र यासाठी लागणारे भांडवल हेच अनेक शेतकऱ्यांसाठी सर्वात मोठे अडथळे ठरते. या पार्श्वभूमीवर ग्लोबल विकास ट्रस्टने पुढाकार घेत शेतकऱ्यांसाठी आशेचा किरण निर्माण केला आहे. केळी आणि तुती लागवडीसारख्या उत्पन्नक्षम पिकांसाठी आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना AU Small Finance बँकेच्या माध्यमातून कर्जरूपाने सहाय्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे आधुनिक, नियोजनबद्ध आणि बाजारपेठेच्या दृष्टीने सक्षम शेतीकडे वळण्याचा मार्ग तर सुकर झाला आहे त्याबरोबरच शून्य गुंतवणुकीची आधुनिक शेती करता येणार आहे.

जलनायक मयंक गांधी यांचे स्वप्न म्हणजे पारंपरिक शेतीच्या मर्यादांमधून शेतकऱ्यांची मुक्तता करून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे. त्याच दृष्टीने मराठवाड्यातील शेतीव्यवस्थेचा अभ्यास करून, स्थानिक गरजा ओळखून आणि समस्यांवर ठोस उपाय शोधून विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. पोखरा योजनेत समाविष्ट गावांतील शेतकऱ्यांना नव्याने फळबाग लागवडीसाठी विशेष प्रोत्साहन देण्यात येत आहे. केळी लागवडीसाठी २ एकर क्षेत्र मर्यादेपर्यंत कमाल २ लाख २० हजार रुपयांपर्यंत, तर तुती लागवडीसाठी ३ लाख २० हजार रुपयांपर्यंत विना तारण कर्ज उपलब्ध करून दिले जात आहे. कर्जप्रक्रिया सुलभ ठेवण्यात आली असून, लागवडीपासून काढणीपर्यंत तांत्रिक मार्गदर्शन व आवश्यक सहकार्य ग्लोबल विकास ट्रस्टकडून दिले जाणार आहे. शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घेऊन उत्पन्नवाढीचा आणि शाश्वत शेतीचा मार्ग स्वीकारावा, असे आवाहन ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

### ■ संपर्क करा, माहिती आणि सहकार्य मिळवा

पोखरा योजनेत समावेश असलेल्या गावांतील शेतकऱ्यांना तुती लागवडीसाठी ग्लोबल विकास ट्रस्ट आणि AU Small Finance बँकेच्या माध्यमातून कर्ज स्वरूपात आर्थिक सहाय्य करण्यात येत आहे. तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत पण शेतकरी सर्व गावांमध्ये केळी लागवड करू शकतात. केळी लागवडीसाठी जास्तीत जास्त 2 लाख 20 हजार कमाल मर्यादा पर्यंत तर तुती लागवड करण्यासाठी पोखरा योजनेअंतर्गत गावातील शेतकऱ्यांसाठी 3 लाख 20 हजार रुपयांचे कर्ज सुरुवातीला देण्यात येत आहे. ही संपूर्ण प्रक्रिया समजून घेण्यासाठी शिवलिंग रुद्राक्ष (8591314682), मुक्तेश्वर कडभाने (8591304662) यांच्याशी संपर्क करावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# परळीतील वार्ड क्र. 10 अंधारात आणि तहानलेला!




**परळी वैजनाथ |**

नगर परिषद हद्दीतील वार्ड क्रमांक 10 मधील संपूर्ण परिसर सध्या मूलभूत सुविधांअभावी नागरिकांच्या संतापाचा केंद्रबिंदू ठरत आहे. या वार्डात स्ट्रीट लाईटची सुविधा अत्यंत अपुरी असल्याने संपूर्ण परिसर रात्रीच्या वेळी अंधारात बुडालेला असतो. परिणामी नागरिकांना रात्री ये-जा करताना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असून अपघात, चोरी, महिलांची असुरक्षितता यांसारख्या गंभीर समस्या निर्माण होत आहेत.

विशेष म्हणजे, वार्ड क्रमांक 10 मधील अशोक नगर परिसरात पिण्याच्या पाण्यासाठी आजही स्वतंत्र व योग्य पाईपलाईनची व्यवस्था करण्यात आलेली नाही. त्यामुळे येथील नागरिकांना रोजच्या रोज पाण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे. अनेक कुटुंबांना दूरवरून पाणी आणावे लागत असून, नगर परिषद प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

नगर परिषदेकडून कर वसुली नियमितपणे केली जाते; मात्र त्या बदल्यात मूलभूत सुविधा देण्यात अपयश येत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. "कर आम्ही भरायचा आणि सुविधा मात्र मिळत नाहीत, हा अन्याय किती दिवस सहन करायचा?" असा सवाल संतप्त नागरिक उपस्थित करत आहेत.

तरी वार्ड क्रमांक 10 मधील संपूर्ण भागात तातडीने आवश्यक त्या ठिकाणी स्ट्रीट लाईट बसविण्यात याव्यात तसेच अशोक नगर परिसरात स्वतंत्र पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन मंजूर करून प्रत्यक्षात कार्यान्वित करण्यात यावी, अशी जोरदार मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

नगर परिषद प्रशासनाने या दोन्ही गंभीर प्रश्नांकडे तातडीने लक्ष देऊन ठोस व वेळबद्ध कार्यवाही न केल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात येत आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का, की वार्ड क्रमांक 10 चे नागरिक अंधारात आणि तहानलेलेच राहणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.






# श्रृंगेरी विद्यालयात वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात संपन्न; प्रबोधनात्मक सादरीकरणाने वेधले लक्ष

**आष्टी | प्रतिनिधी**

शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित शृंगेरी विद्यालय, ब्रह्मगाव येथे वार्षिक स्नेहसंमेलन अत्यंत उत्साहात आणि शिस्तबद्ध वातावरणात पार पडले. केवळ मनोरंजनच नव्हे, तर विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देत सामाजिक भान जागवणाऱ्या सादरीकरणांमुळे हे संमेलन परिसरात चर्चेचा विषय ठरले आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. अभयराजे धोंडे होते. यावेळी बोलताना ते म्हणाले की, "विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ पुस्तकी ज्ञान पुरेसे नसून, त्याला सांस्कृतिक कार्यक्रमांची जोड असणे आवश्यक आहे. शृंगेरी विद्यालयाची संस्कारक्षम आणि मूल्याधिष्ठित वाटचाल खरोखरच प्रेरणादायी आहे. या स्नेहसंमेलनाच्या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे विद्यार्थ्यांनी सादर केलेले प्रबोधनात्मक नाट्य. मोबाईलचा अतिवापर, त्यामुळे होणारे अपघात, दुचाकीवरील निष्काळजीपणा आणि तरुण पिढीवर होणारे मोबाईलचे दुष्परिणाम या विषयांवर विद्यार्थ्यांनी प्रभावी अभिनय करत उपस्थितांना अंतर्मुख केले. यासोबतच देशभक्तीपर गीते, विविध नृत्याविष्कार, समूहनृत्य आणि लघुनाट्यांनी कार्यक्रमात मोठी रंगत आणली. या कार्यक्रमाला मा. सतीश आबा शिंदे (जिल्हा परिषद सदस्य), मा. हरिदास विधाते (प्रशासकीय अधिकारी, शे. शि. प्र. मंडळ), राकेश शाही (एसबीआय बँक मॅनेजर), अशोक डोके सर (आदर्श मुख्याध्यापक),रोहिदास पवार (सरपंच), सचिन हराळ (उपसरपंच)उत्तम बोडखे (ज्येष्ठ पत्रकार) संतोष सानप (तालुका पत्रकार संघ अध्यक्ष), अण्णासाहेब साबळे (दैनिक लोकनेता सहसंपादक), विजय हराळ (मेजर), संजय हराळ, परमेश्वर पवार, शिवाजी सानप, मारुती सानप, संदीप पानसाडे यांच्यासह अनेक ग्रामस्थ, पालक आणि विविध संस्थांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन मुख्याध्यापिका सौ.सविता माने व सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केले होते.

# कांदा उत्पादक संकटात; निर्यात धोरण आणि वाढत्या आवकीमुळे दरात मोठी घसरण

संतोष सानप | आष्टी

मागील काही दिवसांपासून महाराष्ट्रातील बाजार समित्यांमध्ये लाल कांद्याची आवक प्रचंड वाढली असून, त्या तुलनेत मागणी घटल्याने कांद्याचे दर ₹१,००० ते ₹१,४०० प्रति क्विंटल पर्यंत खाली आले आहेत. अनेक ठिकाणी तर कांद्याला प्रति किलो ५ ते ८ रुपये इतका अल्प दर मिळत असल्याने शेतकऱ्यांचा उत्पादन खर्चही निघणे कठीण झाले आहे.

- **कांद्याचे दर का घसरले? (प्रमुख कारणे)**
- **अचानक वाढलेली आवक:**

अतिवृष्टी आणि लांबलेल्या पावसामुळे यंदा खरीप आणि लेट खरीप कांद्याची लागवड उशिरा झाली होती. आता हा सर्व कांदा एकाच वेळी बाजारात आल्याने 'पुरवठा जास्त आणि मागणी कमी' अशी स्थिती निर्माण झाली आहे.

- **आंतरराष्ट्रीय स्पर्धा:**

जागतिक बाजारपेठेत, विशेषतः आखाती देशांमध्ये चीन आणि पाकिस्तानचा कांदा भारतापेक्षा स्वस्त दरात उपलब्ध आहे. यामुळे भारतीय कांद्याची मागणी थंडावली आहे.

- **बांगलादेशचे धोरण:**

भारताचा प्रमुख आयातदार देश असलेल्या बांगलादेशने स्वतःच्या देशातील शेतकऱ्यांचे हित जपण्यासाठी आयातीवर काही निर्बंध आणले आहेत, तसेच तिथे स्थानिक उत्पादनही उपलब्ध असल्याने भारतीय निर्यातीला खिळ बसली आहे.

- **निर्यात शुल्काचा अडथळा:**

केंद्र सरकारने निर्यातबंदी उठवली असली, तरी सध्याचे कर आणि अटींमुळे भारतीय कांदा जागतिक स्पर्धेत महाग ठरत आहे.

- **सरकारचे सध्याचे निर्यात धोरण काय आहे?**

भारत सरकारचे कांदा निर्यात धोरण सध्या 'मुक्त' असले तरी त्यावर काही तांत्रिक मर्यादा आहेत:

- **किमान निर्यात मूल्य (MEP):**

सरकारने पूर्वी $५५० प्रति टन इतके किमान निर्यात मूल्य ठेवले होते, जे नंतर शिथिल करण्यात आले असले तरी जागतिक बाजारपेठेतील घसरलेल्या किमतींमुळे भारतीय कांदा अजूनही स्पर्धात्मक ठरू शकलेला नाही.

- **निर्यात शुल्क:**

केंद्र सरकारने यापूर्वी असलेले ४०% निर्यात शुल्क २०% पर्यंत खाली आणले होते, जेणेकरून निर्यात वाढावी. मात्र, सद्यस्थितीत हे शुल्कही शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना जास्त वाटत आहे.

- **धोरणात्मक अनिश्चितता:**

व्यापाऱ्यांच्या मते, सरकारच्या धरसोड वृत्तीच्या धोरणामुळे (कधी निर्यातबंदी तर कधी निर्यात शुल्क) आंतरराष्ट्रीय खरेदीदारांचा भारतीय बाजारपेठेवरचा विश्वास कमी झाला आहे.

- **बाजार समितीमधील सध्याची स्थिती (अंदाजे दर)**

| बाजार समिती | सरासरी दर (प्रति क्विंटल) | स्थिती |
|---|---|---|
| लासलगाव | ₹१,२०० - ₹१,३५० | मोठी घसरण |
| पिंपळगाव | ₹१,१५० - ₹१,४०० | आवक जास्त |
| सोलापूर | ₹९०० - ₹१,३०० | दरात चढ-उतार |
| पुणे (गुलटेकडी) | ₹१,००० - ₹१,५०० | स्थिर पण कमी |



शेतकऱ्यांची मागणी: "कांदा उत्पादक शेतकरी सध्या दुहेरी संकटात आहे. एकीकडे खते आणि मजुरीचा खर्च ३५ टक्क्यांनी वाढला आहे आणि दुसरीकडे बाजारभाव निम्म्यावर आले आहेत. सरकारने तातडीने निर्यात शुल्क पूर्णपणे रद्द करावे आणि कांद्याला हमीभाव किंवा अनुदान जाहीर करावे," अशी मागणी शेतकरी संघटनांकडून केली जात आहे.

# धनंजय मुंडेंच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यास मोठे यश

**संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह योजनेतून बीड जिल्ह्यात आणखी 11 वसतिगृहे उभारणीस शासनाकडून 159.36 कोटी रुपये निधी उपलब्ध!**

**ऊसतोड कामगारांच्या मुला - मुलींना दर्जेदार शिक्षणाची वाट मोकळी**

**स्व. अजितदादांनी बीड येथील ऊसतोड कामगार मेळाव्यात धनंजय मुंडेना दिला होता शब्द!**

मुंबई | प्रतिनिधी

लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळाच्या अंतर्गत तत्कालीन सामाजिक न्याय मंत्री धनंजय मुंडे यांनी सुरू केलेल्या संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेला व्यापक स्वरूप प्राप्त होत असून धनंजय मुंडे यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला मोठे यश आले आहे.

धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय मंत्री असताना २५ जून, २०२१ रोजी या योजनेची घोषणा करून प्रत्यक्षात अंमलबजावणी सुरू केली होती. त्यामुळे मुंडे जनक असलेल्या संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सर्व 11 तालुक्यांमध्ये शंभर क्षमतेचे मुलींसाठी एक व मुलांसाठी एक असे एकूण 22 वसतीगृह मंजूर करून भाड्याच्या जागेत सुरू करण्यात आलेले आहेत. दरम्यान त्यापैकी आतापर्यंत तीन वसतीगृहांना स्वतःची जागा व निधी मिळालेला असून त्याचे बांधकाम प्रगतीपथावर असून, उर्वरित 19 पैकी 11 वसतीगृहांसाठी जागेसह 159 कोटी छत्तीस लाख रुपयांचा निधी राज्य शासनाने उपलब्ध करून दिला आहे. याबाबतचा शासन निर्णय सामाजिक न्याय विभागाच्या वतीने निर्गमित करण्यात आला आहे.

ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या हातात भविष्यात कोयत्याच्या ऐवजी वही, पुस्तक आणि पेन यावेत असे स्वप्न उराशी बाळगून धनंजय मुंडे यांनी सामाजिक न्याय मंत्री असताना संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेची घोषणा करत सुरुवात केली होती.



त्या अंतर्गत ऊसतोड कामगारांची सर्वाधिक संख्या असलेल्या राज्यातील 41 तालुक्यांमध्ये 82 वसतीग्रह सुरू करण्याची घोषणा धनंजय मुंडे यांनी करून बीड जिल्ह्यातील सर्व 11 तालुक्यांमध्ये प्रत्येकी दोन याप्रमाणे 22 वसतीग्रहे भाड्याच्या जागेत सुरू केली होती.

दरम्यान यापैकी तीन वसतीगृहे ही स्वतःच्या जागेमध्ये उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला असून आता आणखी उर्वरित 19 पैकी 11 वसतीगृहांसाठी निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यामध्ये परळी सह पाटोदा, गेवराई, केज, माजलगाव या तालुक्यातील प्रत्येकी दोन तर बीड तालुक्यातील एक वसतिगृह उभारले जाणार आहे. तर प्रयत्न वसतिगृह उभारणीसाठी सुमारे १४ कोटी ५५ लाख रुपये इतका निधी खर्च केला जाणार आहे.

## अजितदादांचा शब्द अन् मुंडेंची कृतज्ञता

**काही दिवसांपूर्वी बीड जिल्हा दौऱ्यावर असताना तत्कालीन उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री दिवंगत नेते स्वर्गीय अजितदादा पवार यांनी बीड येथे आयोजित एका ऊसतोड कामगारांच्या मेळाव्यामध्ये धनंजय मुंडे यांनी आजपर्यंत ऊसतोड कामगारांसाठी केलेल्या कामाचे कौतुक करतानाच संत भगवान बाबा शासकीय वसतीगृह योजनेतून सर्व 11 तालुक्यांमध्ये बावीस वसतीगृह ही स्वतःच्या जागेत उभारून देऊ व त्यासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही असा शब्द दिला होता, तो शब्द आता पूर्णत्वाकडे जात असून धनंजय मुंडे यांनी स्व. अजितदादा पवार यांची आठवण काढत त्यांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र भाऊ फडणवीस, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांचेही आभार व्यक्त केले आहेत.**

# छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) परिसरातील खड्डा ; अनेक महिन्यांपासून जीवघेणा ठरलेला खड्डा अखेर प्रशासनाने बुजवला ; नागरिकांच्या मागणीला यश

**छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) ते चेंबरी रेस्ट हाऊस पर्यंतचा सिमेंट रस्ता तात्काळ करावा- बालाजी चाटे**

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

परळी शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) परिसरातील मुख्य रस्त्यावर पडलेला प्रचंड मोठा खड्डा अखेर प्रशासनाने बुजवला असून बालाजी चाटे व नागरिकांच्या तीव्र मागणीला यश आले आहे. या खड्ड्यामुळे दररोज नागरिक, वाहनचालक, विद्यार्थी व भाविकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत होता. महाशिवरात्रीपूर्वी खड्डे बुजवल्यामुळे येणाऱ्या भाविकानीं व नागरिकांनी वाहनधारकांनी समाधान व्यक्त केले आहे. छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) ते चेंबरी रेस्ट हाऊस पर्यंतचा सिमेंट रस्ता तात्काळ करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते बालाजी चाटे यांनी केली आहे.

छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) या ठिकाणहुन जाणारा हा रस्ता दोन ते तीन जिल्ह्यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा मार्ग असून दररोज हजारो वाहनांची वर्दळ येथे असते. तरीही महिनोन्महिने खड्डा न बुजविणे हे प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे जिवंत उदाहरण होते. या खड्याच्या बातमी सामाजिक कार्यकर्ते बालाजी चाटे यांनी शहरातील सर्व व्रतपत्र (पेपर )ला दिली असता अखेर पत्रकार बांधव व नागरिकांच्या दबावामुळे प्रशासनाला जाग आली, अशी प्रतिक्रिया स्थानिकांनी व्यक्त केली.

या परिसरात इंग्रजी व मराठी माध्यमांच्या नामांकित शाळा व महाविद्यालये असून सध्या दहावी-बारावीच्या परीक्षा सुरू आहेत. खराब रस्त्यांमुळे विद्यार्थ्यांचा वेळ वाया जात होता, तसेच अपघाताचा धोका वाढला होता. खड्डा बुजवल्यामुळे पालक, विद्यार्थी व वाहनधारकांनी समाधान व्यक्त केले आहे. तसेच डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी उड्डाणपुलावरून शिवाजीनगरकडे उतरताना असलेला धोकादायक खड्डाही प्रशासनाने बुजवला आहे. त्यामुळे संभाव्य अपघात टळले असून बालाजी चाटे व परिसरातील नागरिकांनी प्रशासनाचे आभार मानले आहेत.



दरम्यान, छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) ते चेंबरी रेस्ट हाऊस दरम्यानचा रस्ता तातडीने सिमेंट रस्त्यात रूपांतरित करावा, अशी ठाम मागणी बालाजी चाटे यांनी केली आहे. महाशिवरात्री निमित्त देशभरातून लाखो भाविक परळी वैजनाथ येथे येणार असून, तसेच देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो-2026 साठी मोठ्या संख्येने शेतकरी व पशुपालक येणार आहेत.

परळी शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक (इटके कॉर्नर) परिसरातील मुख्य रस्त्यावर पडलेला प्रचंड मोठा आणि जीवघेणा खड्डा अखेर प्रशासनाने बुजवला आहे. तसेच प्रशासनाने तात्पुरती उपाययोजना केली असली तरी कायमस्वरूपी तोडगा म्हणून सिमेंट रस्त्याचे काम तात्काळ सुरू करावे, अन्यथा पुन्हा आंदोलन छेडण्याचा इशाराही बालाजी चाटे यांनी दिला आहे.

# ना.पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतील महापशुधन एक्स्पोत शेतकरी व पशुपालकांनी सहभाग नोंदवावा-उमाताई समशेट्टे

परळी (प्रतिनिधी)

परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात येत असलेल्या 'महापशुधन एक्स्पो-२०२६' या अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. ना.पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो-2026 या भव्य या प्रदर्शनाच्या माध्यमातून राज्यातील आणि देशातील पशुपालकांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळावी म्हणून आयोजित करण्यात आले आहे. ना.पंकजाताई मुंडे यांच्या संकल्पनेतून होणाऱ्या परळी वैद्यनाथ येथील देशपातळीवरील महापशुधन एक्स्पो-2026 या भव्य प्रदर्शनाचा शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संखेने सहभाग घ्यावा असे आवाहन भाजपच्या शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे यांनी केले आहे.

परळी शहरातील तहसिल समोरील मैदानावर दि.13 फेब्रुवारी ते 15 फेब्रुवारी दरम्यान राष्ट्रीय पशुप्रदर्शन संपन्न होत असून परळी हे पशुप्रदर्शन ३२ एकरांच्या भव्य परिसरात होणार आहे. शेतकऱ्यांना व बेरोजगारांना दूध,मांस,अंडी उत्पादनाची नवीन माहिती मिळावी आणि त्यातून त्यांच्या हाताला काम मिळून त्यांचा आर्थिक विकास ग्रामीण



अर्थव्यवस्था बळकट करण्यासंदर्भात मार्गदर्शित ठरणार आहे.या पशुपक्षी प्रदर्शनाचे उद्घाटन शुक्रवार दि. १३ फेब्रुवारी रोजी ना. पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते तर बक्षीस वितरण रविवार दि. १५ फेब्रुवारी रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे.परळीच्या इतिहासात प्रथमच देश पातळीवरील पशुधन महा एक्सपो आयोजित करण्यात आला आहे.या भव्य प्रदर्शनाचा शेतकरी व पशुपालकांनी मोठ्या संखेने सहभाग घ्यावा असे आवाहन भाजपच्या शहराध्यक्षा सौ.उमाताई चंद्रकांत समशेट्टे यांनी केले.

# कर्कश आवाज करणाऱ्या वाहनांवर परळी शहर पोलिसांची कारवाई

**कर्कश ऐकताच सदरील 9225092825 या नंबर वर व्हिडिओ बनवून गाडीच्या क्रमांकासहित टाकावा**


परळी | प्रतिनिधी

शहरात मोठ्या प्रमाणावर वाढत चाललेल्या कर्कश आवाज करणाऱ्या वाहनांमुळे नागरिकांना होणारा त्रास आणि ध्वनीप्रदूषणाच्या वाढत्या समस्येची दखल घेत परळी शहर पोलीस स्टेशनच्या वतीने विशेष कारवाई करण्यात आली.

या कारवाईत एपीआय नितीन गट्टूवार, पीएसआय अमोल शिंगणे, पोलीस कर्मचारी प्रल्हाद भताने, तसेच होमगार्ड गीत्ते, होमगार्ड हरणे यांच्यासह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

शहरातील विविध भागांत ध्वनीप्रदूषण करणाऱ्या, विशेषतः सायलेंसरमध्ये बदल करून कर्कश आवाज निर्माण करणाऱ्या वाहनांची तपासणी करण्यात आली. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली.





पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, वाहनांमध्ये बेकायदेशीर बदल करून ध्वनीप्रदूषण करू नये. अशा प्रकारांमुळे केवळ कायदेशीर कारवाईच होत नाही तर सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यावरही परिणाम होतो.

परळी शहरात शांतता आणि सुव्यवस्था राखण्यासाठी अशा प्रकारच्या कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

पोलीस ठाण्यामार्फत आव्हान करण्यात येते की शहरांमध्ये कर्कश आवाज करत फिरणाऱ्या गाड्या दिसत असल्यास त्याचा व्हिडिओ बनवून पोलीस स्टेशनचा शासकीय क्रमांक

कर्कश ऐकताच सदरील 9225092825 या नंबर वर व्हिडिओ बनवून गाडीच्या क्रमांकासहित टाकावा.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक चेतना तिडके, सहाय्यक पोलीस अधीक्षक ऋषिकेश शिंदे, पोलीस निरीक्षक रघुनाथ नाचन यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.